CR2015021613

वाचा - १. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. सिटीएस १०८३/४५८४३/३३६८/ल-१, मुंबई, दिनांक १६/४/१९८५.

२. विशेष कार्य अधिकारी, महसूल व वनविभाग यांचेकडील नं. सिटीएस १०८३/४५८४३/३३६८/ल-१, मुंबई, दिनांक १९/९/१९८५.

---

क्र/ना.भू.१/मि.प.अक्षरी नोंद / २०१५

पुणे, दिनांक - ०९/२/२०१५

06 FEB 2015

परिपत्रक :

विषय - मिळकत पत्रिकेवरील क्षेत्राची अक्षरी नोंद करणेबाबत.

सद्यस्थितीत मिळकत पत्रिकेच्या विहीत नमुन्यात मिळकतीचे क्षेत्र अंकी दाखल करणेची सुविधा आहे. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र. विसआ ०७११ / १३१४ / प्र.क्र.३८९/ ल-१, दिनांक २/८/२०११ अन्वये महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०११ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्र.५१४ अन्वये प्रॉपर्टी कार्डावर नाव असावे, काही वेळा प्रॉपर्टी कार्डवर आकडे असतात, त्यामध्ये खाडाखोड असल्याने ते पुन्हा अक्षरी करावे लागतात याबाबतीत निश्चित सूचना दिल्या जातील असे आश्वासन देण्यात आले होते. त्यासंबंधी सूचना प्राप्त झालेवरुन जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे कार्यालयाकडील पत्र क्र.ना.भू.१/ अक्षरी अंकी मिळकत पत्रिका / कावि ६३/२०१४, दिनांक २१/५/२०१४ अन्वये शासनास अहवाल सादर करणेत आला होता.

त्या अनुषंगाने मा.प्रधान सचिव, (महसूल) मंत्रालय, मुंबई यांचेशी झालेल्या चर्चेनुसार मिळकत पत्रिकेवर क्षेत्र अंकी आणि अक्षरी लिहिणे आवश्यक आहे असे ठरले. त्याची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (ना.भू.) पुणे यांचे अध्यक्षतेखाली भूमि अभिलेख विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची समिती नियुक्त करणेत आली होती. सदर समितीने याविषयी केलेल्या शिफारशींचा विचार करुन खालील प्रमाणे कार्यवाहीसाठी सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. नगर भूमापन अधिकारी / उपअधीक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयातील सर्व गावांचे प्रत्येक मिळकत पत्रिकेवरील नमूद क्षेत्र व चौकशी नोंदवहीतील क्षेत्र याची वाजवी ती खात्री करुन रीतसर फेरफाराचे नोंद घेऊन अक्षरी क्षेत्र नमुद करावे. त्याकरिता आडवी नोंद घालण्यात यावी. नोंदीचा सर्व मजकूर धारकाचे नाव या सदरात यावा.

उपसंचालक भूमि अभिलेख
पुणे प्रदेश पुणे
आवक क्रमांक....७२१०....

२. नगर भूमापन अधिकारी / उपअधीक्षक भूमि अभिलेख यांनी सदरचे परिपत्रक निर्गमित झालेनंतर मिळकत पत्रिकेची नक्कल देणेपूर्वी त्या मिळकत पत्रिकेवर क्षेत्राबाबतच्या अक्षरी नोंदीचा फेरफार घेवूनच देण्यात यावा.

३. सदरचे कामाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

स्वाक्षरी/-(चंद्रकांत दळवी)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे.

प्रत - उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण / भूमापन / नागरी भूमापन / एकत्रीकरण ) पुणे यांना माहितीसाठी.

पुणे प्रदेश पुणे

प्रत - उपसंचालक भूमि अभिलेख, सर्व यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत - जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सर्व यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत - प्राचार्य, भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद यांना माहितीसाठी.

प्रत - उपअधीक्षक भूमि अभिलेख सर्व / नगर भूमापन अधिकारी, सर्व यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत - सर्व कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांना माहितीसाठी.

" निर्गमित "

( किशोर तवरेज )
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे